MHPU120004292025	**नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०२५** **निशाणी क्रमांक ०५ व १२३ वरील संयुक्त आदेश** (योगेश विठ्ठल महांगरे विरूद्ध छाया गोविंद सुर्वे व इतर)

वादी यांनी निशाणी ५ वर अर्ज दाखल करून दावा मिळकती मधील त्यांचे कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अथवा त्यांचेतर्फे इतर कोणत्याही इसमांनी हरकत अडथळा करू नये तसेच दावा मिळकतीची विक्री करु नये याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ८ ते १० व १२ ते १४ यांनी वादी अथवा त्यांच्या तर्फे इसमांनी दावा मिळकत म्हणजेच गट क्र.२७२/५ या मिळकतीमध्ये असलेल्या प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये याकरीता वादी यांच्या विरोधात निशाणी १२३ वर मनाईकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

(प्रस्तुतचे दोन्ही अर्ज हे एकमेकांशी संलग्न असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी सदरचे दोन्ही अर्ज एकत्रात विचारात घेत आहे.)

वादी यांच्या निशाणी ५ च्या अर्जातील कथने येणेप्रमाणे.

०३. दावा मिळकतीचे वर्णन :–

मौजे भोर, ता. भोर, जिल्हा पुणे येथील गट क्र.२७२/५, एकूण क्षेत्र १ हे. ४० आर. पैकी वादीने घेतलेले क्षेत्र ३.५० आर. त्याच्या चतुःसीमा खालील प्रमाणे –

पूर्वेस – गट क्र. २७२/६ ची मिळकत,
पश्चिमेस – गट क्र. २७१ व २७४ ची मिळकत,
दक्षिणेस – गट क्र. २७२/४ ची मिळकत,
उत्तरेस – नगरपालिकेचा अंतर्गत रस्ता.

(येणेप्रमाणे उपरोक्त वाद मिळकतीस यापुढे सोईकरीता "दावा मिळकत" असे संबोधण्यात येईल)

०४. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही मुळची बांदल कुटुंबाची मिळकत होती व सदर मिळकत ही बाळा रानु बांदल याच्या नावावर होती. सदर बाळा रानु बांदल यास विठ्ठल रानु बांदल हा भाऊ, चांगुणा बबन बांदल ही पुतणी होती. सदर बांदल कुटुंबामध्ये वाटप होवून प्रत्येकी ५ आणे ४ पै हिस्सा त्यांच्या वाटेला आला होता. सदर बाळा रानु बांदल यास पैशाची गरज असल्याने त्याने त्याच्या क्षेत्रापैकी ८ आर मिळकत प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना दि.२४.११.१९९९ रोजी नोंदणीकृत दस्ताद्वारे विक्री केलेली आहे. तसेच सदर दस्ताप्रमाणे ताबा देखील देण्यात आलेला होता व त्याप्रमाणे कपांऊड घालण्यात आलेले होते.

०५. वादीच्या कथनाप्रमाणे त्यानंतर प्रतिवादी क्र.६ व ११ यांनी दि.१६.०५.२०१२ रोजी १५ आर क्षेत्र हे प्रतिवादी क्र.८ ते १० यांना खरेदीदस्ताआधारे विक्री केलेले आहे. त्याप्रमाणे सदर प्रतिवादी क्र.८ ते १० हे ताबे वहिवाटीत आहेत. त्यानंतर प्रतिवादी क्र.६ व ११ यांनी दि.१३.०६.२०१२ रोजी १५ आर क्षेत्र हे प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांना विक्री केलेले आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांना ताबा देखील देण्यात आलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांना सन १९९९ मध्ये करण्यात आलेल्या खरेदी दस्ताच्या आधारे ३.५० आर इतके क्षेत्र मिळालेले होते. त्याप्रमाणे तिचा जागेवर प्रत्यक्ष ताबा देखील होता. त्यानंतर सदर प्रतिवादी क्र.१ यांनी दि.२३.१२.२००८ रोजी सदरची जागा ही प्रतिवादी क्र.१५ यांना विक्री केलेली आहे. त्यानंतर दि.१४.०६.२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१५ यांनी सदरची जागा ही वादी यांना विक्री केलेली आहे.

०६. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१५ यांनी सदर ठिकाणी लोखंडाचे खांब रोवून कंपाऊड घातलेले होते. परंतु सदरचे खांब खराब झाल्याने वादी यांनी सिमेंटचे खांब घालून कपांऊड केलेले आहे. अशारितीने सन २०१३ पासून वादी यांचा

सदर मिळकतीवर प्रत्यक्ष कब्जा आहे. परंतु दि.१७.०३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.६, ८,९,११, ५० व ५१ यांनी वादीचे खांब पाडून टाकून त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्याबाबत वादी यांनी पोलीसात तक्रार दिली असता दिवाणी बाब असल्याने पोलीसांनी न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला दिला. सबब, वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादीस सकृतदर्शनी केस असून न्यायाचा तराजू देखील त्यांच्या लाभात आहे. अशा परिस्थितीत तुर्तातुर्त मनाई न मिळाल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०७. प्रतिवादी क्र.१, ६, ८ ते १४, ५० व ५१ यांनी त्यांची कैफियत दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादी यांनी दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१५ यांच्याकडून खरेदी घेतलेली आहे. तत्पूर्वी सदर प्रतिवादी क्र.१५ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून दावा मिळकत खरेदी केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी सर्वे क्र.२७२/५ मधील ८ आर क्षेत्र हे सामाईकात खरेदी घेतलेले आहे. सदर खरेदी खतात दिलेल्या चतुःसिमा व दावा मिळकतीच्या चतुःसिमा यामध्ये तफावत आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.१५ यांना विक्री केलेल्या खरेदीखतामध्ये देखील चतुःसिमा या दावा मिळकतीपेक्षा वेगळया आहेत. त्याचप्रमाणे सदर प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकत विक्री करण्यापूर्वी इतर सहहिस्सेदारांची परवानगी घेतलेली नाही. त्याचप्रमाणे सदर खरेदीखतास वहिवाटीप्रमाणे नकाशा देखील लावण्यात आलेला नाही. त्यामुळे दावा मिळकतीचा बोध होत नाही.

०८. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे सन १९९९ च्या खरेदीखताने प्रतिवादी क्र.१ हिने दावा मिळकतीपैकी ३.५० आर इतके क्षेत्र खरेदी घेतलेले आहे. परंतु सदर क्षेत्र हे सामाईकात असल्याने प्रतिवादी क्र.१ हिचा कधीही ताबा नव्हता. प्रतिवादी क्र.५० व ५१

यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. याउलट ते केवळ प्रतिवादी क्र.१० यांचे भाऊ असल्याने त्यांना त्रास देवून त्यांच्याकडून पैसे उकळविण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

०९. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे गट क्र.२७२/५ या मिळकतीत बाळा रानु बांदल, विठ्ठल रानु बांदल व चांगुणा बबन बांदल यांचा प्रत्येकी ५ आणे ४ पै इतका हिस्सा होता. त्यापैकी प्रत्येकाने त्यांच्या हिश्यापैकी काही मिळकतींची वेगवेगळया खरेदीखताद्वारे विक्री केलेली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४ यांनी काही मिळकती या प्रतिवादी क्र.६ यांच्याकडून विकत घेतलेल्या आहेत. सदर खरेदीखतास प्रतिवादी क्र.११ यांनी संमती दिलेली आहे. त्यानंतर सदर प्रतिवादी यांनी पूर्व बाजूस त्यांच्या स्वखर्चाने १० फुटाचा उत्तर दक्षिण असा डांबरी रस्ता तयार केलेला आहे. तसेच दावा मिळकतीची स्वखर्चाने सरकारी मोजणी केलेली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४ यांची प्रत्यक्षात वहिवाट आहे. वादी यास केवळ नगरपालिका रस्त्याजवळ वहिवाट हवी असल्याने वादी यांनी सदरचा बनावट दावा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी सदरचा रस्ता ट्रॅक्टरच्या सहाय्याने उखडून टाकून प्रतिवादी यांचे तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान केलेले आहे. त्याचप्रमाणे दि.१२.०५.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.९ व ११ हे दावा मिळकतीत गेले असता त्यांना देखील शिवीगाळ केलेली आहे. त्याबाबत त्यांनी संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रार देखील दिलेली आहे. सबब, त्यांनी वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

१०. प्रतिवादीच्या नि.१२३ वरील अर्जातील संक्षिप्त तथ्य खालीलप्रमाणे :–

अ. मौजे भोर, ता.भोर येथील गट क्र.२७२/५ क्षेत्र १ हे. ४० आर त्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे,

पूर्वेस – सर्वे क्र.२७२/६ ची मिळकत

पश्चिमेस – सर्वे क्र.२७२/४ ची मिळकत,

दक्षिणेस – सर्वे क्र.२७१ ची मिळकत,

उत्तरेस – नगरपालिका रस्ता व सर्वे क्र.२६२ ची मिळकत.

ब. प्रतिवादी क्र.८ ते १०, १२ ते १४ यांनी खरेदी घेतलेल्या मिळकतीच्या एकत्रीत चतुःसिमा खालीलप्रमाणे,

पूर्वेस – याच मिळकतीतील अंतर्गत १० फुटीचा रस्ता व त्या पलीकडे सर्वे क्र.२७२/६ ची मिळकत,

पश्चिमेस – एकनाथ बबन बांदल यांची मिळकत,

दक्षिणेस – संदीप बांदल व मुळ वादी यांची मिळकत,

उत्तरेस – गोरे यांची मिळकत व त्यापलीकडे नगरपालिकेचा सामाईक रस्ता व सर्वे क्र.२६५ ची मिळकत.

११. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे उपरोक्त मिळकत ही बांदल कुटुंबीयांची वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकत ही बांदल कुटुंबियांनी वेगवेगळया खरेदीखताने वेगवेगळया खरेदीदारांना विक्री केलेली आहे. त्याप्रमाणे मुळ वादी यांचे पुर्वहक्कदार व इतर यांनी ८ आर इतके क्षेत्र सन १९९९ मध्ये बाळा रानु बांदल यांच्याकडून खरेदी घेतलेली आहे. सदर खरेदी मिळकतीमध्ये छाया गोविंद सुर्वे यांचा ३.५ आर इतका हिस्सा होता. त्यानंतर सदर छाया सुर्वे यांनी सन २००८ मध्ये सदर मिळकत ही विनोद नाझीरकर यांना विक्री केलेली आहे. परंतु सदर खरेदीखतामध्ये चतुःसिमा या सामाईकातील नमूद केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी १५ आर इतके क्षेत्र कृष्णा बाळु बांदल यांच्याकडून खरेदी घेतलेले आहे. सदर खरेदीपत्रात नमूद केलेल्या चतुःसिमा या संपूर्णपणे सर्वे क्र.२७२/५ या गटाच्या आहेत. त्याचप्रमाणे मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांनी १५ आर इतके क्षेत्र कृष्णा बाळु बांदल

यांच्याकडून दि.१३.०६.२०१२ रोजी खरेदी घेतलेले आहे. सदर खरेदीपत्रामध्ये देखील सर्वे क्र.२७२/५ या गटाच्या चतुःसिमा आहेत.

१२. प्रतिवादीच्या कथनांप्रमाणे दि.०९.१०.२०२४ रोजी सरकारी मोजणी होवून दि.०६.११.२०२४ रोजी हद्द कायम केलेली आहे. त्याचप्रमाणे मुळ मालक कृष्णा बांदल यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी वहिवाटीनुसार ताबे पावती करुन दिलेली आहे व वहिवाटीचा नकाशा देखील जोडलेला आहे. मुळ प्रतिवादी यांनी त्यांच्या हिश्याची मिळकत विकसीत करत असताना मुळ मालकाने सदर मिळकतीच्या पुर्वेस सुरुवातीला ५ फुट उत्तर दक्षिण जागा रस्त्याकरीता सोडलेली होती. त्याऐवजी प्रस्तुत प्रतिवादी यांनी पुर्वेकडील बाजूस उत्तर दक्षिण १० फुटाचा डांबरी रस्ता स्वखर्चाने केलेला आहे. त्यानंतर मुळ वादी यांना हव्यास असल्याने व रस्त्यालगत जागा मिळाल्यास त्यांचा फायदा होईल या भावनेपोटी मुळ वादी यांनी प्रस्तुत प्रतिवादी यांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर मुळ मालक यांनी देखील त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी कोणाचेही ऐकून घेतले नाही याउलट कोणालाच सोडणार नाही अशी धमकी दिली.

१३. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दि.१२.०५.२०२५ रोजी प्रतिवादी हे दावा मिळकतीत गेले असता मुळ वादी यांनी त्यांना शिवीगाळ करुन धमकी दिली. तसेच सदरचा रस्तादेखील ट्रॅक्टरच्या सहाय्याने उखडून टाकला. त्यानंतर प्रतिवादीविरुध्दच बनावट तक्रार पोलीसात दाखल केली. मुळ वादी हे प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत असल्याने प्रतिवादी यांनी सदरचा प्रतिदावा दाखल केलेला आहे. परंतु सदर प्रतिदावा निकाली होण्यास बराच कालावधी जाणार आहे. दरम्यानच्या काळात मुळ वादी यांनी प्रतिवादीच्या वहिवाटीस हरकत अडथळा करु नये या कारणास्तव प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

१४. मुळ वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिदावा हा कायद्यात बसणारा नसल्याने तो खर्चासह नामंजूर

होण्यास पात्र आहे. तसेच आवश्यक पक्षकारांना दाव्यात समाविष्ट न केल्याने दावा चालण्यास पात्र नाही. पुढे त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिदाव्यातील वादी क्र.१ ते ३ यांनी सन २०१२ मध्ये १५ आर इतके क्षेत्र खरेदी केलेले आहे. त्यांच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे–

पूर्वेस – सर्वे क्र.२७२/६ ची मिळकत,

पश्चिमेस – सर्वे क्र.२७२/४ ची मिळकत,

दक्षिणेस – सर्वे क्र.२७२ ची मिळकत,

उत्तरेस – सोपान राऊत यांची मिळकत.

१५. त्याचप्रमाणे प्रतिदाव्यातील वादी क्र. ४ ते ६ यांनी मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.६ व ११ यांच्याकडून १५ आर क्षेत्र सन २०१२ मध्ये विकत घेतलेले आहे. त्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे –

पूर्वेस – सर्वे क्र.२७२/६ ची मिळकत,

पश्चिमेस – सर्वे क्र.२७२/४ ची मिळकत,

दक्षिणेस – सर्वे क्र.२७२ ची मिळकत,

उत्तरेस – सोपान राऊत यांची मिळकत.

उपरोक्त बाब विचारात घेता दोन्ही खरेदीखतामध्ये चतुःसिमा एकच असल्याचे दिसून येते. परंतु वादी यांनी प्रतिदाव्यामध्ये वर्णन केलेल्या चतुःसिमा या कपोकल्पीत व सोयीनुसार केलेल्या आहेत. त्यामुळे सदर प्रतिदाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ ची बाधा येते. सदर प्रतिदावा हा ३० आर क्षेत्राबाबत दाखल केलेला आहे. परंतु ३० आर क्षेत्राचे विभाजन झालेले नाही, ते अद्याप गट क्र.२७२/५ चा भाग आहे. त्यामुळे सदर गटाचा सर्व सहहिस्सेदारांना पक्षकार केल्याशिवाय प्रतिदावा चालण्यास पात्र नाही. त्याचप्रमाणे सहहिस्सेदार यांच्याविरुध्द मनाई मागता येत नाही.

१६. मुळ वादींच्या कथनाप्रमाणे मुळ प्रतिवादी यांनी वेडयावाकडया कागदांच्या आधारे जागेवर ताबा दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच मुलतः कोणताही

कायदेशीर रस्ता नसल्याने तो उखडून टाकण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या तक्रारी या खोटया व खोडसाळ आहेत. मुळ प्रतिवादी यांनी दि.०६.११.२०२४ रोजी संपुर्ण गट क्र. २७२/५ ची मोजणी केलेली होती. सदर मोजणीमध्ये गट क्र. २७२/५ च्या पुर्ण चतुःसिमा दाखविलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सन २०१२ सालानंतर किंवा त्यापूर्वीदेखील गट क्र. २७२/५ बाबत बरीच खरेदीखते झालेली आहेत. त्यामुळे कृष्णा बाळु बांदल हा एकमेव मालक नाही. त्यामुळे त्यांनी करुन दिलेली ताबा पावती ही बेकायदेशीर आहे. त्याप्रमाणे नोटराईज्ड कागदाच्या आधारे मालकी व ताबा येवू शकत नाही. मुळ वादींच्या कथनाप्रमाणे वादीचा ताबा हा सदोष स्वरुपाचा आहे. सबब, त्यांनी रक्कम रु.५०,०००/– खर्चासह प्रतिदावा नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

१७. प्रस्तुत प्रकरणात अद्याप सर्व पक्षकारांना नोटीस अथवा समन्स बजावणी झालेली नाही. परंतु वादीचा मनाईचा अर्ज हा केवळ प्रतिवादी क्र.६, ८, ९, ११, ५० व ५१ यांच्या विरोधात असल्याने तसेच प्रतिवादी यांचा मनाईचा अर्ज हा केवळ वादी यांच्याविरोधात असल्याने दोन्ही वकीलांच्या संमतीने दोन्ही अर्जांवर युक्तीवाद ऐकण्यात आला.

१८. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात. त्यावर मी कारणांसहित उत्तरे यापुढे नमुद करीत आहे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	प्रथमदर्शनी केस ही कोणाच्या लाभात आहे ?	**मुळ प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४.**
२.	तुर्तातूर्त मनाई न दिल्यास कोणाचे अपरिमित नुकसान	**मुळ प्रतिवादी क्र.८**

	होणार आहे ?	**ते १० व १२ ते १४.**
३.	सोयीस्करतेचा तुला कोणाच्या बाजुने आहे ?	**मुळ प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४.**
४.	आदेश काय ?	**मुळ वादी यांचा अर्ज नामंजुर करण्यात येतो. मुळ प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४. यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.**

१९. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनाशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे.

–का र ण मि मां सा –

२०. प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरीता आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली करताना खालील गोष्टींची पडताळणी करणे आवश्यक आहे.

अ. सकृतदर्शनी केस.

ब. अपरिमित नुकसान.

क. सोयीचा समतोल.

ड. पक्षकारांचे वर्तन (Conduct of the parties)

मुद्दा क्रमांक १ करीता :–

२१. मुद्दा क्रमांक १ हा सकृतदर्शनी केस यासंबंधी आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये सकृतदर्शनी केस याबाबत व्याख्या दिलेली नाही. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय

व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध न्यायनिवाडयांमध्ये सकृतदर्शनी केस निश्चित केलेली आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे जर एखादया गोष्टीचे पुरावे दिले गेल्यास ती गोष्ट शाबीत होईल. थोडक्यात सकृतदर्शनी केस म्हणजे वादीच्या यशाची शाश्वती. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादीचा ताबा असून प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीमधील ताब्यास हरकत अडथळा निर्माण करत आहेत. तसेच सदर प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. सबब, त्यांना प्रतिबंधित करणे आवश्यक आहे. याउलट प्रतिदाव्यातील कथनाप्रमाणे मुळ वादी हे प्रतिदाव्यातील मिळकतीमध्ये प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. सबब, त्यांचेविरुध्द मनाई देणे आवश्यक आहे.

२२. प्रस्तुत दोन्ही अर्ज हे मनाईकरीता दाखल करण्यात आलेले आहेत. कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार मनाई जारी करत असताना ताबा पाहणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्ज निर्गमित करत असताना देखील पक्षकारांचा ताबा सकृतदर्शनी विचारात घेणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांनी एकमेकांची खरेदीखते थोडक्यात मान्य केलेली आहेत. त्यावरुन सकृतदर्शनी त्यांच्यात खरेदीखतावरुन वाद दिसून येत नाहीत. केवळ ताबे वहिवाटीवरुनच त्यांच्यात वाद असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीच्या वादपत्राचे अवलोकन करता वादी यांनी सन २०१३ मध्ये प्रतिवादी क्र.१५ यांच्याकडून दावा मिळकत ३.५ आर क्षेत्र विकत घेतल्याचे स्पष्ट कथन केले आहे व सदर मिळकतीचा ताबा देखील घेतला असल्याचे कथन केले आहे. परंतु युक्तीवादादरम्यान वादीच्या विद्वान विधीज्ञांनी वादी व प्रतिवादी हे सहभागधारक असल्याचा युक्तीवाद केलेला आहे.

२३. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने हे नमूद करणे आवश्यक आहे की कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार सह मालक अथवा सहभागधारक यांच्याविरुध्द

मनाई देता येत नाही. परंतु वादी यांनी त्यांच्या वादपत्रातील कथनांमध्ये त्यांना खरेदीखताप्रमाणे ताबा मिळाल्याचे कथन केलेले आहे. अशा परिस्थितीत त्यांना वादपत्रापलीकडे जावून युक्तीवाद अथवा बाजू मांडता येणार नाही. त्यामुळे वादी, प्रतिवादी यांचा ताबा हा सहभागधारकाप्रमाणे आहे अथवा त्यांचा खरेदीखताप्रमाणे स्वतंत्र ताबा आहे किंवा कसे हे पाहणे महत्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणात आधी म्हटल्याप्रमाणे सन १९९९ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी सामाईकात ८ आर इतके क्षेत्र खरेदी केल्याची बाब उभय पक्षकारांना मान्य असल्याचे दिसून येते. सदर खरेदीपत्राची प्रत वादी यांनी दाखल केलेली आहे. सदर खरेदीपत्राचे अवलोकन करता त्यामध्ये ३.५ आर इतके क्षेत्र हे प्रतिवादी क्र.१ यांचे असल्याचे दिसून येते. तसेच सदर खरेदीपत्रामध्ये मिळकतीचा ताबा दिल्याचे देखील परिच्छेद क्र.३ मध्ये स्पष्टपणे नमूद आहे. सदर मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.१५ यांना सन २००८ मध्ये खरेदी दिल्याचे दिसून येते. सदर खरेदीखत देखील अभिलेखावर दाखल करण्यात आलेले आहे. त्याचे अवलोकन करता सदर खरेदीखतामध्ये देखील ताबा दिल्याबाबत स्पष्टपणे म्हणण्यात आलेले आहे. याबाबतीत हे नमूद करणे यथायोग्य आहे की, मुळात प्रतिवादी क्र.१ यांनी खरेदी केलेली मिळकत ही प्रतिवादी क्र.१ ते ५ यांची सामाईक मिळकत होती. अशा परिस्थितीत प्रथमतः प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यात वाटप होवून त्याप्रमाणे क्षेत्र तुटक होवून त्यानंतर ताबा देणे योग्य ठरले असते. परंतु सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यात वाटप झाल्याबाबत अभिलेखावरील कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे वादी यास देण्यात आलेला ताबा हा खरोखरच दिला किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते.

२४. वादी यांनी युक्तीवादादरम्यान सहभागीदार असल्याने सर्वांचा दावा मिळकतीत ताबा असल्याचा युक्तीवाद केलेला आहे. सदर युक्तीवाद क्षणापुरता गृहीत धरता आधी म्हटल्याप्रमाणे सहभागीदारा विरोधात मनाई देता येत नाही. उपरोक्त चर्चेचे

एकत्रीत विवेचन करता वादी याच्या ताब्याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. सबब, ताब्याशिवाय वादी हा मनाई मिळण्यास पात्र ठरत नाही.

२५. प्रतिवादी यांनी देखील वादी याच्या विरोधात मनाई मागितलेली आहे. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी दावा मिळकत २७२/५ मधील ३० आर क्षेत्र हे खरेदी केलेले आहे. सदर खरेदी क्षेत्रात प्रतिवादी यांची वहिवाट आहे. परंतु वादी हा सदर वहिवाटीस हरकत अडथळा करत आहे. प्रतिवादी यांनी खरेदी घेतलेली खरेदीपत्रे अभिलेखावर दाखल आहेत. सदर खरेदीपत्राचे अवलोकन करता सन २०१२ मध्ये प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी १५ आर क्षेत्र खरेदी दस्त क्र.२०२८/२०१२ अन्वये खरेदी घेतलेले आहे. सदर खरेदीपत्रामध्ये देखील चतुःसिमापूर्वक ताबा दिल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दि.१३.०६.२०१२ रोजीच्या खरेदी दस्त क्र.२६१७/२०१२ चे अवलोकन करता प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांनी सर्वे क्र.२७२/५ मधील १५ गुंठे क्षेत्र चतुःसिमापूर्वक खरेदी घेतल्याचे व तिचा ताबा दिल्याचे दिसून येते. परंतु सदर दोन्ही खरेदीखतात सर्वे क्र.२७२/५ मधील क्षेत्राच्या चतुःसिमा या एकच असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यामधील ताब्यावरुन देखील प्रश्नचिन्ह निर्माण होते.

२६. प्रतिवादी यांनी ताबा दाखविण्याकरीता सन २०२५ मध्ये प्रतिवादी व खरेदी देणार कृष्णा बाळु बांदल, संदीप कृष्णा बांदल (प्रतिवादी क्र.६ व ११) यांच्यामध्ये करण्यात आलेली ताबा पावती दाखल केलेली आहे. सदर ताबा पावतीचे अवलोकन करता खरेदी खतामध्ये देण्यात आलेला ताबा हा सरकारी मोजणीप्रमाणे कायम केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादी यांनी खरेदी केलेली मिळकत ही खरेदी देणार कृष्णा बाळु बांदल, संदीप कृष्णा बांदल (प्रतिवादी क्र.६ व ११) यांचे पूर्वहक्कदार बाळु बांदल यांच्याकडून सन १९९९ मध्ये खरेदी केलेली आहे. यावरुन वादी व प्रतिवादी यांनी एकाच कुटुंबाकडून क्षेत्र विकत घेतल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच हे नमूद करणे आवश्यक आहे की, मुळ वादी यांनी त्यांच्या

वादपत्रामध्ये परिच्छेद क्र.४ मध्ये प्रतिवादी क्र.८ ते १० यांचा ताबा मान्य केल्याचे दिसून येते. तसेच परिच्छेद क्र.५ मध्ये प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांचा ताबा मान्य केलेला आहे. त्यामुळे वादी यांना आता त्यांच्या पूर्व कथनांशी विसंगत असा युक्तीवाद करता येणार नाही. त्यामुळे सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४ यांच्या खरेदी क्षेत्रामध्ये ताबा दिसून येतो. सबब, प्रथमदर्शनी सदर ताबा सवंर्धित करणे आवश्यक आहे. उपरोक्त चर्चेचे विवेचन करता प्रतिदाव्यामधील वादी यांना सकृतदर्शनी केस असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर त्याप्रमाणे नोंदवित आहे.

मुद्दा क्रमांक २ व ३ करीता :-

२७. मुद्दा क्रमांक २ हा अपरिमित नुकसान व मुद्दा क्रमांक ३ हा सोयीचा समतोल याच्याशी निगडीत असल्यामुळे सदरचे दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न आहेत. सबब, पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेकरीता मी उपरोक्त दोन्ही मुद्दे एकत्रीत चर्चित आहेत.

२८. कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार प्रथमदर्शनी पक्षकारांनी केवळ सकृतदर्शनी केस शाबीत करणे योग्य नाही. त्याचबरोबर त्यांनी तुर्तातूर्त मनाई न दिल्यास त्यांना अपरिमित असे नुकसान होवू शकते तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे. मुळ वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीची विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. सबब, त्यांचे विरुध्द मनाई देणे आवश्यक आहे. त्याबाबतीत हे नमूद करणे योग्य आहे की, प्रतिवादी हे विक्री करत असल्याबाबत सकृतदर्शनी वादीच्या तोंडी कथनांशिवाय दुसरे कोणतेही सबळ कागदपत्र अभिलेखावर नाहीत. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी वादीची ३.५ आर क्षेत्रामध्ये मालकी मान्य केल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी मालकी मान्य केली असल्यामुळे वादीचे क्षेत्र विकण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे त्याबाबतीत मनाई देणे योग्य नाही.

२९. प्रतिदाव्यातील प्रतिवादींचे कथनानुसार मुळ वादी हे त्यांच्या दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. मुळ वादी यांनी

युक्तीवादादरम्यान ते सहमालक असल्याने सर्वांचा एकत्रीत ताबा असल्याबाबत युक्तीवाद केलेला आहे. सदर युक्तीवाद विचारात घेता तसेच परिच्छेद क्र.२४ मधील विवेचन विचारात घेता मुळ वादीच्या ताब्याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. तसेच मुळ वादी हा मुळ प्रतिवादीच्या प्रतिदाव्यातील ताब्यास हरकत अडथळा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सकृतदर्शनी मोजणी झाल्याचे देखील दिसून येते. सबब, मुळ प्रतिवादी यांनी मागितलेली मनाई न दिल्यास ताब्याबाबत क्लिष्टता निर्माण होवून मुळ प्रतिवादी यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दाव्यामध्येदेखील विविधता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सोयीचा समतोल देखील मुळ प्रतिवादी यांच्या लाभात आहे. तसेच मी प्रतिवादीने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांचे देखील अवलोकन केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्रातील शपथदार यांची कथने अद्याप पुराव्यांती शाबित व्हायची आहेत. त्यामुळे साक्षीपुराव्याशिवाय केवळ सदर कथनांवर विसंबून राहणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर प्रतिज्ञापत्रे ही प्रतिवादीस उपयोगी ठरत नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर त्याप्रमाणे नोंदवित आहे.

मुद्दा क्रमांक ४ करीता –

३०. मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचनावरुन प्रतिदाव्यातील वादीस (मुळ प्रतिवादी) प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येते, तसेच सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान देखील त्यांचे होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुळ प्रतिवादी यांनी मागितलेली मनाई देणे न्यायोचित होईल. त्यामुळे मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाकरीता मी, पुढील आदेश पारीत करतो.

– आ दे श –

१. मुळ वादीचा नि.५ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. मुळ प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४ यांचा प्रतिदाव्यातील नि.१२३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

३. मुळ वादी अथवा त्यांच्या तर्फे हक्क सांगणाा-या इतर कोणत्याही इसमांना दाव्याच्या निकालापर्यंत मुळ प्रतिवादी क्र.८ ते १० व १२ ते १४ यांच्या प्रतिदाव्यातील दावा मिळकत ब मधील ताबे वहिवाटीस हरकत अडथळा करण्यापासुन तुर्तातुर्त हुकूमाद्वारे मनाई करण्यात येते.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.05.02 17:57:57 +0530

ठिकाणः- भोर. **(एस.डी.शिरसाट)**
दिनांकः- ०२.०५.२०२६. **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर.**